कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

प्रसिध्दी पत्रक

दिनांक 22.03.2021

आलोसे 1) परवीन उमरदराजखान पठाण, वय 47 वर्ष, नायब तहसिलदार (पुरवठा) , तहसिल कार्यालय, कळंब (वर्ग -2) आलोसे 2) श्रीरंग साधु डोंगरे, वय 64 वर्ष, व्यवसाय स्वस्त धान्य दुकानदार, कोथळा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद (खाजगी ईसम) 3) विलास ज्ञानोबा पिंगळे,वय 74वर्ष, व्यवसाय स्वस्त धान्य दुकानदार, पाथर्डी ता.कळंब, जि.उस्मानाबाद (खाजगी ईसम) यांनी 6700/- रुपये लाचेची मागणी करुन 6700/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्या व पत्ता | 1) परवीन उमरदराजखान पठाण, वय 47 वर्ष, नायब तहसिलदार (पुरवठा) , तहसिल कार्यालय, कळंब (वर्ग -2) 2) श्रीरंग साधु डोंगरे, वय 64 वर्ष, व्यवसाय स्वस्त धान्य दुकानदार, कोथळा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद 3) विलास ज्ञानोबा पिंगळे,वय 74वर्ष, व्यवसाय स्वस्त धान्य दुकानदार, पाथर्डी ता.कळंब, जि.उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दिनांक 22.03.2021 रोजी 1451 वा. कळंब येथील राहुल जाजु यांचे एम.आर.एफ.टायरचे शोरुममध्ये |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 6693/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांनी कोरोना काळात मोफत धान्य वाटपाचे बील एकुण 44622/- रुपये काढण्यासाठी बीलाचे 15 टक्के प्रमाणे 6693/- रुपये लाचेची मागणी तिन्ही आरोपीतांनी करुन लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन आरोपी क्रमांक 2 यांनी दिनांक 22.03.2021 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन पंच साक्षिदारा समक्ष 6700/- रुपये लाच रक्कम स्विकारली. |

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 22.03.2021 रोजी तक्रारदार यांचे कामासाठी पठाण मॅडम, डोंगरे व पिंगळे हे तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करतात अगर कसे याकरिता शासकिय पंचासमक्ष राहुल जाजु यांचे टायरचे शोरुममध्ये व तहसिल कार्यालय, कळंब येथे लाचमागणी पडताळणी केली असता पठाण मॅडम, डोंगरे व पिंगळे यांनी पंच साक्षिदारासमक्ष तक्रारदार यांचेकडे त्यांनी वाटप केलेल्या मोफत धान्याचे मानधनाचे तीन महिन्याचे बील एकुण 44622/- रुपये काढण्यासाठी 15 टक्के प्रमाणे 6693/- रुपये लाचेची मागणी करुन लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाचमागणी पडताळणीत निष्पन्न झाले होते.

त्यावरुन दिनांक 22.03.2021 रोजीच सापळा कारवाईचे आयोजन केले असता, सापळा कारवाई दरम्यान आरोपी श्रीरंग डोंगरे यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचसाक्षिदारा समक्ष 6700/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यावरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद, श्री प्रशांत संपते, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि, उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.उस्मानाबाद यांनी केली असुन सदर कारवाईस पोहेकॉ शेख, पोना मारकड, पोशि बेळे, पोशि डोके, पोशि ताबसकर, चालक पोना करडे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

1) मा.श्री.राहुल खाडे,, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

2) श्री.प्रशांत सपंते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

3) टोल फ्री क्र. 1064, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID**:-dysposmanabad@gmail.com

(प्रशांत संपते)
पोलीस उप अधीक्षक ,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.

Scanned with CamScanner